माहिती हवीय?

नारायण फातर्पेकर, बांबोलीम-गोवा.

❑ **जयश्री गडकरनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात नायिकेची भूमिका केलीय?**

– *गाठ पडली ठका ठका, आलिया भोगासी, आई मला क्षमा कर, पहिलं प्रेम, उतावळा नारद, पतिव्रता, सांगत्ये ऐका, अवघाची संसार, लग्नाला जातो मी, पैशाचा पाऊस, पंचारती, मानिनी, कलंकशोभा, मानिनी, रंगपंचमी, शाहीर परशुराम, वैजयंता, बाप माझा ब्रह्मचारी, भाग्यलक्ष्मी, प्रीती विवाह, सुख आले माझ्या दारी, मोहित्यांची मंजुळा, नार निर्मिते नरा, सुभद्राहरण, सुखाची सावली, एक दोन तीन, काय हो चमत्कार, सवाल माझा ऐका, सुंदरा मनामध्ये भरली, वैशाख वणवा, आई कुणा म्हणू मी, कधी करिशी लग्न माझे, मल्हारी मार्तंड, साधी माणसं, युगे युगे मी वाट पाहिली, ही नार रुपसुंदरी, हिरवा चुडा, पाटलाची सून, पवनाकाठचा धोंडी, बाई मी भोळी, सांगू कशी मी?, श्रीमंत मेहुणा पाहिजे, सुरंगा म्हंत्यात मला, थांब लक्ष्मी कुंकू लावते, एक गाव बारा भानगडी, जिव्हाळा, डोंगराची मैना, गणगौळण, मुरळी मल्हारी रायाची, टिळा लाविते मी रक्ताचा, घरकुल, मीच तुझी प्रिया, आई उदे ग अंबाबाई, अशीच एक रात्र होती, लाखात अशी देखणी, कसं काय पाटील बरं हाय का, कुंकू माझं भाग्याचं, पाठराखीण, सून लाडकी या घरची, मी तुझा पती नाही, सून माझी सावित्री, सुगंधी कट्टा, चांदोबा चांदोबा भागलास का, कडकलक्ष्मी, सवत, बाईन केला सरपंच खुळा, जय तुळजा भवानी* या चित्रपटात.

चारुथा रॉयलवाला, बलसाड.

❑ **रामराज्य चित्रपटात शोभना समर्थबरोबर रामाची भूमिका कोणी साकारली होती?**

– *रामराज्य* हिंदी व मराठीत होता. हिंदीत शोभना समर्थ यांच्या सीतेबरोबर रामाची भूमिका साकारली होती प्रेम अदीबनी आणि मराठीत चंद्रकांतनी.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

❑ **गोविंदाचा पहिला चित्रपट कोणता? त्याने सर्वाधिक चित्रपट कोणत्या अभिनेत्रीबरोबर केले?**

– गोविंदाचा पहिला चित्रपट *तनवदन*. त्याने नीलमबरोबर सर्वाधिक म्हणजे *इल्जाम, लव्ह ८६, खुदगर्ज, सिंदूर, घर में राम गली में श्याम, हत्या, बिल्लू बादशाह, दो कैदी, दोस्त गरीबों का, फर्ज की जंग, ताकतवर, घराना* हे बारा चित्रपट केले.

ज्ञानेश्वर महाडीक, महाड.

❑ **राजश्री प्रॉडक्शनने आपल्या जुन्याच चित्रपटाच्या कथेवर आधारित कोणकोणते चित्रपट बनवलेत? त्यातील कलाकार कोण?**

– *हम आपके है कौन* व *मैं प्रेम की दिवानी हूं*. यापैकी *हम आपके है कौन* राजश्रीने १९८८च्या त्यांच्याच *नदिया के पार* या चित्रपटावरून तयार केला होता. *नदिया के पार*चे कलाकार होते सचिन, साधना सिंह, मिताली, इंदर ठाकूर, *हम आपके है कौन*चे कलाकार होते माधुरी दीक्षित, सलमान खान, मोहनीश बहल, रेणुका शहाणे, अनुपम खेर, रीमा, आलोकनाथ, विंदू.

मैं प्रेम की दिवानी हूं राजश्रीने १९७६च्या त्यांच्याच *चितचोर*से तयार केला होता. *चितचोर*चे प्रमुख कलाकार अमोल पालेकर, झरीना वहाब, विजयेंद्र, ए. के. हंगल, दीना पाठक, मास्टर राजू, *मैं प्रेम की दिवानी हूं*चे प्रमुख कलाकार हृतिक रोशन, अभिषेक बच्चन, करिना कपूर.

संतोष हालकुडे, कुर्डुवाडी.

❑ **किरणकुमारने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केलीय?**

– *राजाकाका, फ्री लव्ह, भुलाभटका, यारी झिंदाबाद, आज की ताजा खबर* या चित्रपटात.

कृष्णा देहेडकर, जालना.

❑ **१९७० ते १९९५ या काळात अमिताभचे कोणकोणते चित्रपट आले?**

– *आनंद*(१९७०), *रेश्मा और शेरा, प्यार की कहानी*(१९७१), *बन्सी बिरजू, रास्ते का पत्थर, संजोग, एक नजर, परवाना*(१९७२), *बॉम्बे टू गोवा, अभिमान, नमक हराम, बंधे हाथ, गहरी चाल, बेनाम, सौदागर, जंजीर*(१९७३), *रोटी कपडा और मकान, मजबूर, कसौटी, जमीर*(१९७४), *फरार, शोले, दीवार*(१९७५), *इमान धरम, दो अनजाने, परवरिश, कभी कभी, हेराफेरी*(१९७६), *अमर अकबर अँथोनी, डॉन, त्रिशूल, चुपके चुपके*(१९७७), *मुकद्दर का सिकंदर, खून पसीना, गंगा की सौगंध, कस्मे वादे, बेशर्म, आलाप, अदालत, बडा कबूतर, अनुबंध*(बंगाली)(१९७८), *मि. नटवरलाल, सुहाग, जुर्माना, काला पत्थर, मंझील, द ग्रेट, गॅम्ब्लर, कोई जिता कोई हारा*(१९७९), *मिली, दोस्ताना, दो और दो पांच, राम बलराम, शान*(१९८०), *लावारिस, नसीब, कालिया, याराना, सिलसिला, बरसात की एक रात, नास्तिक*(१९८१), *देशप्रेमी, बेमिसाल, सत्ते पे सत्ता, नमक हलाल, अंधा कानून*(१९८२), *महान, पुकार*(१९८३), *इन्कलाब, शक्ती, खुद्दार, शराबी, विलायती बाबू, पेट प्यार और पाप*(१९८४), *कुली, मर्द, गिरफ्तार* (१९८५), *आखरी रास्ता*(१९८६), *जलवा*(१९८७), *शहेनशहा, सुरमा भोपाली, गंगा जमना सरस्वती*(१९८८), *हीरो हीरालाल, जादूगर, तुफान, मैं आझाद हूं* (१९८९), *अग्निपथ, आज का अर्जुन* (१९९०), *अजूबा, इंद्रजीत, अकेला, इन्सानियत, हम, खुदागवाह* (१९९१), *अक्का* (मराठी-१९९४).

सुजाता मावळे, नारायणगाव.

❑ **आजवर *अंदाज* या नावाचे किती चित्रपट आले? कलाकार कोण? दिग्दर्शक कोण?**



मेहबूब खान यांच्या १९४९च्या अंदाजमध्ये दिलीपकुमार, राज कपूर, नरगिस

– अक्षयकुमार, लारा दत्ता, प्रियांका चोप्रा यांची भूमिका असलेला सुनील दर्शन यांचा *अंदाज* नुकताच आलाय. यापूर्वी तीन *अंदाज* आले होते. दिलीपकुमार, राज कपूर, नरगिस यांची भूमिका असलेला १९४९चा मेहबूब खान यांचा *अंदाज*. शम्मी कपूर, राजेश खन्ना, हेमामालिनी यांची भूमिका असलेला १९७१चा जी. पी. सिप्पींचा *अंदाज*. अनिल कपूर, करिश्मा कपूर, जूही चावला यांची भूमिका असलेला १९९४चा पहलाज निहलानींचा *अंदाज*.